<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८८/२०१०</u>

निशाण क्र. २१९ लगत

**<u>प्रतिवादी क्र. ३ तर्फे पुढील उलट तपास विधिज्ञ श्री. पी.एस.रानडे यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

४. हे खरे आहे की, मी केस डायरी सोबत आणली नसल्यामुळे मागील तारखेस पुढील तारीख मागून घेतली आहे. आजही मी केस डायरी आणली नाही. मी चौकशी केली परंतु केस डायरी मिळाली नाही. दि. ०६/१२/२०१० रोजीचे कुलमुखत्यार माझ्या तपासकामात निदर्शनास आले होते. या कुलमुखत्यारपत्रात कुलमुखत्यारपत्र करुन देणार याचे फोटो लावलेले होते. फिर्यादी सिमा शंकर तावडे यांचा फोटो या मुखत्यारपत्रावर होता. या मुखत्यारपत्रावरील अंगठा व सही हे सिमा शंकर तावडे यांचा होती किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. सिमा शंकर तावडे यांचा जबाब मी तपासकामी घेतला होता. मी सिमा शंकर तावडे यांच्याकडे फोटो दाखवून तो फोटो त्यांच्याच असल्याबाबत खात्री केली होती. सिमा तावडे यांची त्यांनी ते कुलमुखत्यारपत्र केले नाही अशी तक्रार होती. सिमा तावडे यांचा फोटो कुलमुखत्यारपत्रावर फोटो कसा आला याबाबत मी चौकशी केली होती. ही चौकशी सिमा यांच्याकडे केली होती. सिमा यांनी त्यांच्या जबाबात तो फोटो कुलमुखत्यारपत्रावर कसा आला याबाबत उल्लेख केलेला आहे.

५. देवगड कोर्टात याच घटनेसंदर्भात दाखल असलेली खाजगी फिर्याद मी तपासकामी सामील करुन घेतली होती. ती आता मी सोबत आणली आहे. मी दि. ०७/०१/२०११ रोजीची फिर्यादीने दिलेली पोलीस स्टेशनची तक्रार माझ्या तपासकामात दाखल करुन घेतली होती. या फिर्यादीचा केस डायरीमध्ये उल्लेख आहे किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. दि. ०७/०१/२०११ रोजी माझी पोष्टींग ओरस येथे होतो. या दि. ०७/०१/२०११ रोजीच्या फिर्यादीचा तपास एप्रिल २०११ नंतर आला नक्की तारीख मला सांगता येणार नाही. दि. ०७/१/२०११ रोजीच्या फिर्यादीची दखल देवगड पोलीस ठाण्याच्या अधिका-यांनी घेतली नव्हती. मी केलेल्या तपासात दि. ०७/१/२०११ रोजीच्या फिर्यादीची नक्कल समाविष्ठ करुन घेतली आहे. पोलीस निरिक्षक देवगड या फिर्यादवर आदेश केला नाही. दि. ०७/१/२०११ रोजीची नक्कल देवगड न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपामध्ये सामिल केलेली नाही. हे खरे आहे की, फिर्यादीने जो गुन्हा दाखल केला तिच्या म्हणण्यानुसार तिने पोलीसांकडे दाखल केलेली सर्वांत पहिली फिर्याद दि. ०७/१/२०११ रोजीची होती. हे खरे आहे की, ही दि. ०७/१/२०११ रोजीची फिर्याद फेरीस्तमध्ये नसल्यामुळे त्या फिर्यादीचे म्हणणे काय होते हे कोर्टासमोर आलेले नाही.

६. कुलुखत्याररपत्रावर सिमा हिची सही आरोपीपैकी कोणी केली याबाबतचे टिप्पण नाही. माझ्या तपासात किशोर यु. जोशी या वकीलांनी तपासि अंमलदार यांना काही माहिती पाठविल्याचे निष्पन्न झाले होते. या केसच्या तपासकामी माझे मुंबईला जाणे झाले नाही. या केस संदर्भात देवगड

पोलीसांतून मुंबईला गेला होता किंवा कसे हे मला माहित नाही. किशोर जोशी यांनी पाठविलेली नोटीस या तपासकामात मी दाखल करुन घेतली होती. हे खरे आहे की, त्या नोटीशीव्दारे त्यांच्या पक्षकारांचे फोटो व सही केल्याचे कळविले होते. किशोर जोशी यांचा जबाब मी तपासकामी घेतला नाही. मी तपासकाम कोणाकडून व कधी घेतले होते हे मी सांगू शकत नाही. मी सन २०११ ते २०१३ या काळात सदरचे तपासकाम केले. या काळात मला किशोर जोशी यांचा जबाब आवश्यक असल्याचे वाटले होते. त्यांचा जबाब मला घेण्यास काही अडचण नव्हती. सिमा तावडे यांच्या प्रत्यक्ष सहया व वादग्रस्त सहया मी हस्ताक्षर तज्ञांकडे पाठविलेल्या होत्या. सदरच्या सहया मी दि. १७/८/२०११ व १९/०४/२०१२ रोजी पाठविल्या होत्या. हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल मिळविण्यासाठी मी पाठपुरावा केला नाही. हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल आला होता. दि. २०/०२/२०१९ व दि. ३०/०३/२०१९ या तारखांना अहवाल आले होते. हे खरे आहे की, मी माझा जबाब मी आणलेल्या कागदपत्रांवरुन देत आहे. माझ्या उपलब्ध असलेल्या कागदपत्राआधारे मुखत्यारपत्रावरील सिमा हिचा घेतलेला अंगठा नेमका कोणाचा होता हे मी सांगू शकत नाही. हस्ताक्षर तज्ञांनी सिमा तावडे म्हणून केलेली सही कोणी केली होती याबाबत हस्ताक्षर तज्ञांनी कोणतेही मत दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. भारती सुरेश पवार यांचे शिक्षण दुसरी पर्यंत झाल्याचे त्यांच्या अटक पंचनाम्यात नमूद आहे. त्यांचे दुसरी पर्यंतचे शिक्षण कुठे, कोणत्या शाळेत झाले याबाबत मला सांगता येणार नाही. त्यांचे इंग्रजीचे शिक्षण अजिबात झाले नाही याबाबत मला सांगता येणार नाही. सिमा तावडे हिचे वादग्रस्त मुखत्यारपत्रावरील सही इंग्रजीमध्ये आहे. यातील प्रतिवादी भारती सुरेश पवार यांचे इंग्रजी शिक्षण अजिबात झालेले नाही याबाबत मला काही माहिती नाही. मुखत्यारपत्रावर सिमा शंकर तावडे असे इंग्रजीमध्ये कोणाच्या हस्ताक्षरात लिहिले आहे हे मी सांगू शकत नाही. हे खरे नाही की, माझ्या सोबत केस डायरी नसल्यामुळे मी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर तपशिलवार देवू शकणार नाही. सिमा शंकर तावडे हिचा फोटो कोठून व कधी काढला याबाबत मला काही सांगता येणार नाही. हा फोटो सोसायटीच्या ऑफिसमध्यून काढला होता. ही बाब मला फिर्यादीने सांगितली होती. मी सोसायटीच्या ऑफिसमध्ये याबाबत रुजवात केली नाही. हे खरे आहे की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी फोटो सोसायटीमधुन काढला असे सांगत आहे. हे खरे नाही की, माझे तपासकाम सदोष व निरुपयोगी होते व मी निर्दोष लोकांना खोटया दोषारोपामध्ये गोवले आहे. हे खरे नाही की, भारती पवार यांचा या केसमध्ये कोणताही संबंध नव्हता. हे खरे नाही की, त्या निरपराध आहेत.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

(श्रीमती एन.बी.घाटगे )

दि. १३/०९/२०२३.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड